# 'बीआरटी'त अपघात सुरूच

## तीन विचित्र अपघात ; बेशिस्त चालक व पादचारी जबाबदार

Sakal 16 May 2016

**वडगाव शेरी, ता. १५ :** नगर रस्ता बीआरटी मार्गात कधी किरकोळ; तर कधी मोठे अपघात सुरूच आहेत. बीआरटी मार्गात घुसखोरी करणारे वाहनचालक, चुकीच्या ठिकाणाहून रस्ता ओलांडणारे पादचारी यांच्यामुळे बहुतांश अपघात होत असल्याचे समोर आले आहे.

शनिवारी (ता. १४) दिवसभरात नगर रस्त्यावर 'बीआरटी' मार्गात विविध ठिकाणी तीन विचित्र अपघात झाले. सर्वप्रथम खराडी दर्गा या ठिकाणी खासगी चारचाकी वाहन बीआरटी मार्गात घुसले व त्याने रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीस्वाराला उडविले. यात दुचाकीचालक गंभीर जखमी झाला आहे. दुसरा अपघात रामवाडी विमानतळ पोलिस ठाण्यासमोर झाला. येथे एक नागरिक चुकीच्या ठिकाणाहून रस्ता ओलांडत होता. त्याला बसने उडविले. यात तो गंभीर जखमी झाला. तिसरा अपघात इनॉर्बिट मॉलसमोरील सोमनाथनगरला जाणाऱ्या फाट्यावर झाला.



नगर रस्ता : इनॉर्बिट मॉलसमोर बीआरटी मार्गात झालेला बसचा अपघात.

रस्ता ओलांडण्याचा सिग्नल नसताना एक सायकलचालक बसमार्गात आला. त्याला वाचवण्यासाठी बसचालकाने प्रयत्न केला. त्याचवेळी दुसऱ्या बाजूने एक हातगाडी मध्ये आला. त्याला वाचविताना बसचालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस बीआरटी दुभाजकाला जाऊन धडकली.

यात बीआरटी मार्गाचे, बसचे मोठे नुकसान झाले. बीआरटीच्या मार्गात सोमनाथनगरला जाण्यासाठी मार्ग काढण्यात आला आहे. मात्र बीआरटीच्या मार्गाच्या नकाशात हा फाटाच नाही. स्थानिक लोकप्रतिनिधीच्या हट्टामुळे रस्ता बनविण्यात आला आहे. या ठिकाणी बीआरटी मार्गातील सोमनाथनगरला जाणारा रस्ता बंद केल्यास अपघात होणार नाहीत, अशी मागणी नागरी चेतना मंचच्या कनिज सुखराणी यांनी केली आहे.